.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 13 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १३ ॥

॥ दशक तेरावा : नामरूप ॥ १३ ॥
समास पहिला : आत्मानात्मविवेक
॥ श्रीराम ॥
आत्मानात्मविवेक करावा । करून बरा विवरावा ।
विवरोन सदृढ धरावा । जीवामधें ॥ १॥
आत्मा कोण अनात्मा कोण । त्याचें करावें विवरण ।
तेंचि आतां निरूपण । सावध ऐका ॥ २॥
च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवप्राणी ।
संख्या बोलिली पुराणीं । वर्तती आतां ॥ ३॥
नाना प्रकारीचीं शरीरें । सृष्टींत दिसती अपारें ।
तयामधें निर्धारें । आत्मा कवणु ॥ ४॥
दृष्टीमधें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो ।
रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आतां ॥ ५॥
घ्राणामधें वास घेतो । सर्वांगी तो स्पर्शतो ।
वाचेमधें बोलवितो । जाणोनि शब्द ॥ ६॥
सावधान आणि चंचळ । चहुंकडे चळवळ ।
येकलाचि चालवी सकळ । इंद्रियेंद्वारा ॥ ७॥
पाये चालवी हात हालवी । भृकुटी पालवी डोळा घालवी ।
संकेतखुणा बोलवी । तोचि आत्मा ॥ ८॥
धिटाई लाजवी खाजवी । खोंकवी वोकवी थुंकवी ।
अन्न जेऊन उदक सेवी । तोचि आत्मा ॥ ९॥
मळमूत्रत्याग करी । शरीरमात्र सावरी ।
प्रवृत्ति निवृत्ति विवरी । तोचि आत्मा ॥ १०॥
ऐके देखे हुंगे चाखे । नाना प्रकारें वोळखे ।
संतोष पावे आणी धाके । तोचि आत्मा ॥ ११॥
आनंद विनोद उदेग चिंता । काया छ्याया माया ममता ।
जीवित्वें पावे नाना वेथा । तोचि आत्मा ॥ १२॥
पदार्थाची आस्था धरी । जनीं वाईट बरें करी ।
आपल्यां राखे पराव्यां मारी । तोचि आत्मा ॥ १३॥
युध्ये होतां दोहीकडे । नाना शरीरीं वावडे ।
परस्परें पाडी पडे । तोचि आत्मा ॥ १४॥
तो येतो जातो देहीं वर्ततो । हासतो रडतो प्रस्तावतो ।
समर्थ करंटा होतो । व्यापासारिखा ॥ १५॥
होतो लंडी होतो बळकट । होतो विद्यावंत होतो धट ।
न्यायेवंत होतो उत्धट । तोचि आत्मा ॥ १६॥
धीर उदार आणि कृपेण । वेडा आणि विचक्षण ।
उछ्रक आणि सहिष्ण । तोचि आत्मा ॥ १७॥
विद्या कुविद्या दोहिकडे । आनंदरूप वावडे ।
जेथें तेथें सर्वांकडे । तोचि आत्मा ॥ १८॥
निजे उठे बैसे चाले । धावे धावडी डोले तोले ।
सोइरे धायेरे केले । तोचि आत्मा ॥ १९॥
पोथी वाची अर्थ सांगे । ताळ धरी गाऊं लागे ।
वाद वेवाद वाउगे । तोचि आत्मा ॥ २०॥
आत्मा नस्तां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं ।
देहसंगें आत्मा करीं । सर्व कांहीं ॥ २१॥
येकेंविण येक काये । कामा नये वायां जाये ।
म्हणोनि हा उपाये । देहयोगें ॥ २२॥
देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य ।
अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ॥ २३॥
पिंडी देहधर्ता जीव । ब्रह्मांडीं देहधर्ता शिव ।
ईश्वरतनुचतुष्टये सर्व । ईश्वर धर्ता ॥ २४॥
त्रिगुणापर्ता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर ।
सकळ सृष्टीचा विस्तार । तेथून जाला ॥ २५॥
बरवें विचारून पाहीं । स्त्री पुरुष तेथें नाहीं ।
चंचळरूप येतें कांहीं । प्रत्ययासी ॥ २६॥
मुळींहून सेंवटवरी । ब्रह्मादि पिप्लीका देहधारी ।
नित्यानित्य विवेक चतुरीं । जाणिजे ऐसा ॥ २७॥
जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितुकें नित्य ।
याहिमध्यें नित्यानित्य । पुढें निरोपिलें ॥ २८॥
स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें । कारण माहाकाराण सांडिलें ।
विराट हिरण्यगर्भ खंडिलें । विवेकानें ॥ २९॥
अव्याकृत मूळप्रकृती । तेथें जाऊन बैसली वृत्ती ।
तें वृत्ति व्हावया निवृत्ति । निरूपण ऐका ॥ ३०॥
आत्मानात्माविवेक बोलिला । चंचळात्मा प्रत्यया आला ।
पुढिले समासीं निरोपिला । सारासार विचार ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मानात्माविवेकनाम समास पहिला ॥ १॥ १३.१

समास दुसरा : सारासारनिरूपण
॥ श्रीराम ॥
ऐका सारासार विचार । उभारलें जगडंबर ।
त्यांत कोण सार कोण असार । विवेकें वोळखावा ॥ १॥
दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल ।
जें असतचि असेल । तेंचि सार ॥ २॥
मागां आत्मानात्माविवेक बोलिला । अनात्मा वोळखोन सांडिला ।

आत्मा जाणतां लागला । मुळींचा मूळतंतु ॥ ३॥
मुळीं जे राहिली वृत्ति । जाली पाहिले निवृत्ति ।
सारासार विचार श्रोतीं । बरा पाहावा ॥ ४॥
नित्यानित्य विवेक केला । आत्मा नित्यसा निवडिला ।
निवृतीरूपें हेत उरला । निराकारीं ॥ ५॥
हेत म्हणिजे तो चंचळ । निर्गुण म्हणिजे निश्चळ ।
सारासारविचारें चंचळ । होऊन जातें ॥ ६॥
चळे म्हणोनि तें चंचळ । न चळे म्हणोनि निश्चळ ।
निश्चळीं उडे चंचळ । निश्चयेसीं ॥ ७॥
ज्ञान आणि उपासना । दोनी येकचि पाहाना ।
उपासनेकरितां जना । जगोद्धार ॥ ८॥
द्रष्टा साक्षी जाणता । ज्ञानधन चैतन्यसत्ता ।
ज्ञान देवचि तत्वता । बरें पाहा ॥ ९॥
त्या ज्ञानाचें विज्ञान होतें । शोधून पाहा बहुत मतें ।
चंचळ अवघें नासतें । येणें प्रकारें ॥ १०॥
नासिवंत नासेल किं नासेना । ऐसा अनुमानचि आहे मना ।
तरी तो पुरुष सहसा ज्ञाना । अधिकार नव्हे ॥ ११॥
नित्य निश्चये केला । संदेह उरतचि गेला ।
तरी तो जाणावा वाहावला । माहा मृगजळीं ॥ १२॥
क्षयेचि नाहीं जो अक्षई । व्यापकपणें सर्वां ठाईं ।
तेथे हेत संदेह नाहीं । निर्विकारीं ॥ १३॥
जें उदंड घनदाट । आद्य मध्य सेवट ।
अचळ अढळ अतुट । जैसें तैसें ॥ १४॥
पाहातां जैसें गगन । गगनाहून तें सघन ।
जनचि नाहीं निरंजन । सदोदित ॥ १५॥
चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों अवघाच पूर्वपक्षु ।
निर्गुण ठाईंचा अलक्षु । लक्षवेना ॥ १६॥
संगत्यागेंविण कांहीं । परब्रह्म होणार नाहीं ।
संगत्याग करून पाहीं । मौन्यगर्भा ॥ १७॥
निर्शतां अवघेंचि निर्शलें । चंचळ तितुकें निघोन गेलें ।
निश्चळ परब्रह्म उरलें । तेंचि सार ॥ १८॥
आठवा देह मूळ माया । निर्शोन गेल्या अष्टकाया ।
साधु सांगती उपाया । कृपाळुपणें ॥ १९॥
सोहं हंसा तत्वमसी । तें ब्रह्म तूं आहेसी ।
विचार पाहातां स्थिति ऐसी । सहजचि होते ॥ २०॥
साधक असोन ब्रह्म उरलें । तेथें वृत्तिसुन्य जालें ।
सारासार विचारिलें । येणें प्रकारें ॥ २१॥
तें तापेना ना निवेना । उजळेना ना काळवंडेना ।
डहुळेना ना निवळेना । परब्रह्म तें ॥ २२॥
दिसेना ना भासेना । उपजेना ना नासेना ।
तें येना ना जाईना । परब्रह्म तें ॥ २३॥
तें भिजेना ना वाळेना । तें विझेना ना जळेना ।
जयास कोणीच नेईना । परब्रह्म तें ॥ २४॥
जें सन्मुखचि चहुंकडे । जेथें दृश्य भास उडे ।
धन्य साधु तो पवाडे । निर्विकारीं ॥ २५॥
निर्विकल्पीं कल्पनातीत । तोचि वोळखावा संत ।
येर अवघेचि असंत । भ्रमरूप ॥ २६॥
खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षवंत म्हणावें ।
असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ॥ २७॥
जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते ।
आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे ॥ २८॥
वाच्यांशें भक्ति मुक्ति बोलावी । लक्ष्यांशें तद्रूपता विवरावी ।
विवरतां हेतु नुरावी । ते तद्रूपता ॥ २९॥
सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप म्हणिजे आपलें रूप ।
आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्वनिर्शनाउपरी ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सारासारनिरूपणनाम समास दुसरा ॥ २॥ १३.२

समास तिसरा : उभारणीनिरूपण
॥ श्रीराम ॥
ब्रह्म घन आणि पोकळ । आकाशाहून विशाळ ।
निर्मळ आणि निश्चळ । निर्विकारी ॥ १॥
ऐसेंचि असतां कित्येक काळ । तेथें आरंभला भूगोळ ।
तया भूगोळांचे मूळ । सावध ऐका ॥ २॥
परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ ।
तयास बोलिजे केवळ । आदिनारायेण ॥ ३॥
मूळमाया जगदेश्वर । त्यासीच म्हणिजे शड्गुणैश्वर ।
अष्टधा प्रकृतीचा विचार । तेथें पाहा ॥ ४॥
ऐलिकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणीं ।
मूळ वोंकाराची मांडणी । तेथून जाणावी ॥ ५॥
अकर उकार मकार । तिनी मिळोन वोंकार ।
पुढें पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ॥ ६॥
आकाश म्हणिजेतें अंतरात्म्यासी । तयापासून जन्म वायोसी ।
वायोपासून तेजासी । जन्म जाला ॥ ७॥
वायोचा कातरा घसवटे । तेणें उष्णें वन्हि पेटे ।
सूर्यबिंब तें प्रगटे । तये ठाईं ॥ ८॥
वारा वाजतो सीतळ । तेथें निर्माण जालें जळ ।
तें जळ आळोन भूगोळ । निर्माण जाला ॥ ९॥
त्या भूगोळाचे पोटीं । अनंत बीजांचिया कोटी ।
पृथ्वी पाण्या होता भेटी । अंकुर निघती ॥ १०॥
पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रें पुष्पांचे तरंग ।
नाना स्वाद ते मग । फळें जालीं ॥ ११॥
पत्रें पुष्पें फळें मुळें । नाना वर्ण नाना रसाळें ।
नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जालीं ॥ १२॥
अन्नापासून जालें रेत । रेतापासून प्राणी निपजत ।
ऐसी हे रोकडी प्रचित । उत्पत्तीची ॥ १३॥
अंडज जारज श्वेतज उद्बीज । पृथ्वी पाणी सकळांचे बीज ।

ऐसें हें नवल चोज । सृष्टिरचनेचें ॥ १४ ॥
च्यारि खाणी च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
निर्माण जाले लोक तिनी । पिंडब्रह्मांड ॥ १५ ॥
मुळीं अष्टधा प्रकृती । अवघे पाण्यापासून जन्मती ।
पाणी नस्तां मरती । सकळ प्राणी ॥ १६ ॥
नव्हे अनुमानाचें बोलणें । याचा बरा प्रत्ययें घेणें ।
वेदशास्त्रें पुराणें । प्रत्ययें घ्यावीं ॥ १७ ॥
जें आपल्या प्रत्यया येना । तें अनुमानिक घ्यावेना ।
प्रत्ययाविण सकळ जना । वेवसाये नाहीं ॥ १८ ॥
वेवसाये प्रवृत्ती निवृत्ती । दोहिंकडे पाहिजे प्रचिती ।
प्रचितीविण अनुमानें असती । ते विवेकहीन ॥ १९ ॥
ऐसा सृष्टिरचनेचा विचार । संकळित बोलिला प्रकार ।
आतां विस्ताराचा संहार । तोहि ऐका ॥ २० ॥
मुळापासून सेवटवरी । अवघा आत्मारामचि करी ।
करी आणि विवरी । येथायोग्य ॥ २१ ॥
पुढेंसंव्हार निरोपिला । श्रोतीं पाहिजे ऐकिला ।
इतुक्याउपरी जाला । समास पूर्ण ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
उभारणिनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ १३.३

समास चौथा : प्रलयनिरूपण

॥ श्रीराम ॥

पृथ्वीस होईल अंत । भूतांस मांडेल कल्पांत ।
ऐसा समाचार साध्यंत । शास्त्रीं निरोपिला ॥ १ ॥
शत वरुषें अनावृष्टि । तेणें जळेल हे सृष्टि ।
पर्वत माती ऐसी पृष्ठी । भूमीची तरके ॥ २ ॥
बारा कळीं सूर्यमंडळा । किर्णापासून निघती ज्वाळा ।
शत वरुषें भूगोळा । दहन होये ॥ ३ ॥
सिंधुरवर्ण वसुंधरा । ज्वाळा लागती फणिवरा ।
तो आहाळोन सरारां । विष वमी ॥ ४ ॥
त्या विषाच्या ज्वाळा निघती । तेणें पाताळें जळती ।
माहापावकें भस्म होती । पाताळ लोक ॥ ५ ॥
तेथें माहाभूतें खवळती । प्रळयेवात सुटती ।
प्रळयेपावक वाढती । चहूंकडे ॥ ६ ॥
तेथें अक्रा रुद्र खवळले । बारा सूर्य कडकडिले ।
पावकमात्र येकवटले । प्रळयेकाळीं ॥ ७ ॥
वायो विजांचे तडाखे । तेणें पृथ्वी अवघी तरखे ।
कठिणत्व अवघेंचि फांके । चहुंकडे ॥ ८ ॥
तेथें मेरूची कोण गणना । कोण सांभाळिल कोणा ।
चंद्र सूर्य तारांगणा । मूस जाली ॥ ९ ॥
पृथ्वीनें विरी सांडिली । अवघी धगधगायेमान जाली ।
ब्रह्मांडभटी जळोन गेली । येकसरां ॥ १० ॥
जळोनि विरी सांडिली । विशेष माहावृष्टी जाली ।
तेणें पृथ्वी विराली । जळामधें ॥ ११ ॥
भाजला चुना जळीं विरे । तैसा पृथ्वीस धीर न धरे ।
विरी सांडुनिया त्वरें । जळीं मिळाली ॥ १२ ॥
शेष कूर्म वाऱ्हाव गेला । पृथ्वीचा आधार तुटला ।
सत्व सांडून जळाला । मिळोन गेली ॥ १३ ॥
तेथें प्रळयेमेघ उचलले । कठिण घोषें गर्जिनले ।
अखंड विजा कडकडिले । ध्वनि घोष ॥ १४ ॥
पर्वतप्राये पडती गारा । पर्वत उडती ऐसा वारा ।
निबिड तया अंधकारा । उपमाचि नाहीं ॥ १५ ॥
सिंधु नद्या येकवटल्या । नेणो नभींहून रिचवल्या ।
संधिच नाहीं धारा मिळाल्या । अखंड पाणी ॥ १६ ॥
तेथें मछ मूर्म सर्प पडती । पर्वतासारिखे दिसती ।
गर्जना होतां मिसळती । जळांत जळें ॥ १७ ॥
सप्त सिंधु आवर्णीं गेले । आवर्णवेडे मोकळे जाले ।
जळरूप जालियां खवळले । प्रळयेपावक ॥ १८ ॥
ब्रह्मांडाऐसा तप्त लोहो । शोषी जळाचा समूहो ।
तैसे जळास जालें पाहो । अपूर्व मोठें ॥ १९ ॥
तेणें आटोन गेलें पाणी । असंभाव्य माजला वन्ही ।
तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें ॥ २० ॥
दीपास पालव घातला । तैसा प्रळयेपावक विझाला ।
पुढें वायो प्रबळला । असंभाव्य ॥ २१ ॥
उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितळोन गेला सारा ।
पंचभूतांचा पसारा । आटोपला ॥ २२ ॥
महद्भूत मूळमाया । विस्मरणें वितुळे काया ।
पदार्थमात्र राहावया । ठाव नाहीं ॥ २३ ॥
दृश्य हलकालोळें नेलें । जड चंचळ वितुळलें ।
याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें ॥ २४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
प्रळयेनाम समास चौथा ॥ ४ ॥ १३.४

समास पांचवा : कहाणीनिरूपण

॥ श्रीराम ॥

कोणी येक दोघे जण । पृथ्वी फिरती उदासीन ।
काळक्रमणें लागून । कथा आरंभिली ॥ १ ॥
श्रोता पुसे वक्तयासी । काहाणी सांगा जी बरवीसी ।
वक्ता म्हणे श्रोतयासी । सावध ऐकें ॥ २ ॥
येकें स्त्रीपुरुषें होतीं । उभयेतांमधें बहु प्रीति ।
येकरूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ॥ ३ ॥
ऐसा कांहीं येक काळ लोटला । तयांस येक पुत्र जाला ।
कार्यकर्ता आणि भला । सर्वविषीं ॥ ४ ॥
पुढें त्यासहि जाला कुमर । तो पित्याहून आतुर ।
कांहीं तदर्ध चतुर । व्यापकपणें ॥ ५ ॥
तेणें व्याप उदंड केला । बहुत कन्यापुत्र व्याला ।
उदंड लोक संचिला । नाना प्रकारें ॥ ६ ॥
त्याचा पुत्र जेष्ठ । तो अज्ञान आणि रागिट ।

अथवा चुकता नीट । संव्हार करी ॥ ७॥
पिता उगाच बैसला । लेकें बहुत व्याप केला ।
सर्वज्ञ जाणता भला । जेष्ठ पुत्र ॥ ८ ॥
नातु त्याचें अर्ध जाणें । पणतु तो कांहींच नेणे ।
चुकतां संव्हारणें । माहा क्रोधी ॥ ९ ॥
लेक सकळांचे पाळण करी । नातु मेळवी वरिचावरी ।
पणतु चुकल्यां संव्हार करी । अकस्मात ॥ १० ॥
नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंडचि जाला ।
ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ॥ ११ ॥
विस्तार वाढला गणवेना । वडिलांस कोणीच मानिना ।
परस्परें किंत मना । बहुत पडिला ॥ १२ ॥
उदंड घरकळ्हो लागला । तेणें कित्येक संव्हार जाला ।
विपट पडिलें थोर थोरांला । बेबंद जालें ॥ १३ ॥
नेणपणें भरी भरले । मग ते अवघेच संव्हारले ।
जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें ॥ १४ ॥
बाप लेक नातु पणतु । सकळांचा जाला निपातु ।
कन्या पुत्र हेतु मातु । अणुमात्र नाहीं ॥ १५ ॥
ऐसी काहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला ।
श्रोता वक्ता धन्य जाला । प्रचितीनें ॥ १६ ॥
ऐसी काहाणी अपूर्व जे ते । उदंड वेळ होत जाते ।
इतकें बोलोन गोसावी ते । निवांत जाले ॥ १७ ॥
आमची काहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो ।
ऐसें बोलणें विवरो । कोणीतरी ॥ १८ ॥
चुकत वांकत आठवलें । एतुकें संकळित बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्ष्मा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ १९ ॥
ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर ।
दास म्हणे जग्गोधार । तेचि करिती ॥ २० ॥
त्या जगोद्धाराचें लक्षण । केले पाहिजे विवरण ।
सार निवडावें निरूपण । यास बोलिजे ॥ २१ ॥
निरूपणीं प्रत्ययें विवरावें । नाना तत्वकोडें उकलावें ।
समजतां समजतां व्हावें । निःसंदेह ॥ २२ ॥
विवरोन पाहातां अष्ट देह । पुढें सहजचि निःसंदेह ।
अखंड निरूपणें राहे । समाधान ॥ २३ ॥
तत्वांचा गल्बला जेथें । निवांत कैचें असेल तेथें ।
याकारणें गुल्लिपरतें । कोणीयेकें असावें ॥ २४ ॥
ऐसा सूक्ष्म संवाद । केलाचि करावा विशद ।
पुढिले समासीं लघुबोध । सावध ऐका ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
कहाणीनिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ १३.५

समास सहावा : लघुबोध

॥ श्रीराम ॥

जें बोलिजेती पंचतत्वें । त्यांची अभ्यासाया नावें ।
तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ १ ॥
यामधें शाश्वत कोण । आणी अशाश्वत कोण ।
ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ २ ॥
पंचभूतांचा विचार । नांवरूप सारासार ।
तोचि बोलिला निर्धार । सावध ऐका ॥ ३ ॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश । नावें बोलिलीं सावकास ।
आतां रूपाचा विश्वास । श्रवणें धरावा ॥ ४ ॥
पृथ्वी म्हणिजे ते धरणी । आप म्हणिजे तें पाणी ।
तेज म्हणिजे अग्नि तरणी । सतेजादिक ॥ ५ ॥
वायो म्हणिजे तो वारा । आकाश म्हणिजे पैस सारा ।
आतां शाश्वत तें विचारा । आपले मनीं ॥ ६ ॥
येक शीत चांचपावें । म्हणिजे वर्म पडे ठावें ।
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावे ॥ ७ ॥
पृथ्वी रचतें आणि खचतें । हें तों प्रत्ययास येतें ।
नाना रचना होत जाते । सृष्टिमधें ॥ ८ ॥
म्हणौन रचतें तें खचतें । आप तें हि आटोन जाते ।
तेज हि प्रगटोन विझतें । वारें हि राहे ॥ ९ ॥
अवकाश नाममात्र आहे । तें हि विचारिता न राहे ।
एवं पंचभूतिक राहे । हें तों घडेना ॥ १० ॥
ऐसा पांचा भूतांचा हा विस्तार । नासिवंत हा निर्धार ।
शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ॥ ११ ॥
तो आत्मा कोणास कळेना । ज्ञानेंविण आकळेना ।
म्हणोनियां संतजना । विचारावें ॥ १२ ॥
विचारितां सज्जनांसी । ते म्हणती कीं अविनासी ।
जन्म मृत्यु आत्मयासी । बोलोंच नये ॥ १३ ॥
निराकारीं भासे आकर । आणी आकारीं भासे निराकार ।
निराकार आणी आकार । विवेकें वोळखावा ॥ १४ ॥
निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य ।
यास बोलिजे नित्यानित्य । विचारणा ॥ १५ ॥
सारीं भासे असार । आणि असारीं भासे सार ।
सारासार विचार । शोधून पाहावा ॥ १६ ॥
पंचभूतिक तें माइक । परंतु भासे अनेक ।
आणि आत्मा येक । व्यापून असे ॥ १७ ॥
चहुं भूतांमधें गगन । तैसें गगनीं असे सघन ।
नेहटून पाहातां अभिन्न । गगन आणि वस्तु ॥ १८ ॥
उपाधीयोगेंचि आकाश । उपाधी नस्तां निराभास ।
निराभास तें अविनाश । तैसें गगन ॥ १९ ॥
आतां असो हे विवंचना । परंतु जें पाहातां नासेना ।
तें गे तेंचि अनुमाना । विवेकें आणावें ॥ २० ॥
परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार ।
आणि आपण कोण हा विचार । पाहिला पाहिजे ॥ २१ ॥
देहास अंत येतां । वायो जातो तत्वता ।
हें लटिकें म्हणाल तरी आतां । स्वासोस्वास धारावा ॥ २२ ॥
स्वास कोंडतां देह पडे । देह पडतां म्हणती मडें ।

मद्यास कर्तुत्व न घडे । कदाकाळीं ॥ २३ ॥
देहावेगळा वायो न करी । वायोवेगळा देह न करी ।
विचार पाहातां कांहींच न करी । येकावेगळें येक ॥ २४ ॥
उगेंच पाहातां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहीं नसे ।
अभेदभक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ॥ २५ ॥
कर्ता आपण ऐसे म्हणावें । तरी आपलें इच्छेसारिखें व्हावें ।
इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंच वाव ॥ २६ ॥
म्हणोन कर्ता नव्हे किं आपण । तेथें भोक्ता कैंचा कोण ।
हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २७ ॥
अविचार आणि विचार । जैसा प्रकाश अंधकार ।
विकार आणि निर्विकार । येक नव्हे कीं ॥ २८ ॥
जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींच चालेना ।
खरें तेंचि अनुमाना । कदा न ये ॥ २९ ॥
प्रत्ययास बोलिजे न्याये । अप्रत्यये तो अन्याये ।
जात्यांधास परीक्षा काये । नाना रत्नाची ॥ ३० ॥
म्हणोन ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेंसी अनन्य ।
आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
लघुबोधनाम समास सहावा ॥ ६ ॥ १३.६

समास सातवा : प्रत्यय विवरण

॥ श्रीराम ॥

निर्मळ आभास निराभास । तयास दृष्टांत आकाश ।
आकाश म्हणिजे अवकाश । पसरला पैस ॥ १ ॥
आधीं पैस मग पदार्थ । प्रत्यये पाहातां यथार्थ ।
प्रत्ययेंविण पाहातां वेर्थ । सकळ कांहीं ॥ २ ॥
ब्रह्म म्हणिजे तें निश्चळ । आत्मा म्हणिजे तो चंचळ ।
तयास दृष्टांत केवळ । वायो जाणावा ॥ ३ ॥
घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा ।
विवरतां अर्थ दोहींचा । भिन्न आहे ॥ ४ ॥
भूत म्हणिजे जितुकें जालें । जालें तितुके निमालें ।
चंचळ आलें आणी गेलें । ऐसें जाणावें ॥ ५ ॥
अविद्या जड आत्मा चंचळ । जड कर्पूर आत्मा अनळ ।
दोनी जळोन तत्काळ । विझोन जाती ॥ ६ ॥
ब्रह्म आकाश निश्चळ जाती । आत्मा वायो चंचळ जाती ।
परीक्षवंत परीक्षिती । खरें किं खोटें ॥ ७ ॥
जड अनेक आत्मा येक । ऐसा आतानात्माविवेक ।
जगा वर्तविता जगन्नायेक । तयास म्हणावें ॥ ८ ॥
जड अनात्मा चेतवी आत्मा । सर्वी वर्ते सर्वात्मा ।
अवघा मिळोन चंचळात्मा । निश्चळ नव्हे ॥ ९ ॥
निश्चळ तें परब्रह्म । जेथें नाहीं दृश्यभ्रम ।
विमळ ब्रह्म तें निभ्रम । जैसें तैसें ॥ १० ॥
आधी आत्मानात्माविवेक थोर । मग सारासारविचार ।
सारासारविचारें संव्हार । प्रकृतीचा ॥ ११ ॥
विचारें प्रकृती संव्हारे । दृश्य अस्तांच वोसरे ।
अंतरात्मा निर्गुणीं संचरे । अध्यात्मश्रवणें ॥ १२ ॥
चढता अर्थ लागला । तरी अंतरात्मा चढतचि गेला ।
उतरल्या अर्थें उतरला । भूमंडळीं ॥ १३ ॥
अर्थासारिखा आत्मा होतो । जिकडे नेला तिकडे जातो ।
अनुमानें संदेहीं पडतो । कांहींयेक ॥ १४ ॥
निसंदेह अर्थ चालिला । तरी आत्मा निसंदेहचि जाला ।
अनुमानअर्थे जाला । अनुमानरूपी ॥ १५ ॥
नवरसिक अर्थ चाले । श्रोते तद्रूपचि जाले ।
चाटपणें होऊन गेले । चाटचि अवघे ॥ १६ ॥
जैसा जैसा घडे संग । तैसे गुह्यराचे रंग ।
याकारणें उत्तम मार्ग । पाहोन धरावा ॥ १७ ॥
उत्तम अन्नें बोलत गेले । तरी मन अन्नाकारचि जालें ।
लावण्य वनितेचें वर्णिलें । तरी मन तेथेंचि बैसे ॥ १८ ॥
पदार्थवर्णन अवघें । किती म्हणोन सांगावें ।
परंतु अंतरीं समजावें । होये किं नव्हे ॥ १९ ॥
जें जें देखिलें आणी ऐकिलें । तें अंतरीं दृढ बैसलें ।
हित अन्हित परीक्षिलें । परीक्षवंतीं ॥ २० ॥
याकारणें सर्व सांडावें । येक देवास धुंडावें ।
तरीच वर्म पडे ठावें । कांहींयेक ॥ २१ ॥
नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं ।
ऐसीं चुकतां च गेलीं । जन्मवरी ॥ २२ ॥
सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला ।
लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ॥ २३ ॥
म्हणोन नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती ।
मनीं सुखचि इछिती । परी तें कैंचें ॥ २४ ॥
उदंड सुख जया लागलें । वेडें तयास चुकलें ।
सुख सुख म्हणताच मेलें । दुःख भोगितां ॥ २५ ॥
शाहाण्यानें ऐसें न करावें । सुख होये तेंचि करावें ।
देवासी धुंडित जावें । ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥
मुख्य देवचि ठाई पडिला । मग काये उणें तयाला ।
लोक वेडे विवेकाला । सांडून जाती ॥ २७ ॥
विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।
यांत मानेल तें अवश्यक । केलें पाहिजे ॥ २८ ॥
कर्तयासी वोळखावें । यास विवेक म्हणावें ।
विवेक सांडितां व्हावें । परम दुःखी ॥ २९ ॥
आतां असो हें बोलणें । कर्त्यास वोळखणें ।
आपलें हित विचक्षणें । चुकों नये ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
प्रत्यय विवरणनाम समास सातवा ॥ ७ ॥ १३.७

समास आठवा : कर्तानिरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेंसीं ।

सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ॥ १ ॥
तव बोलिला सभानायेक । जे बोलिके येकाहून येक ।
या बोलण्याचे कौतुक । श्रोतीं सादर ऐकावें ॥ २ ॥
येक म्हणती कर्ता देव । येक म्हणती कोण देव ।
आपुलाला अभिप्राव । बोलते जाले ॥ ३ ॥
उत्तम मध्यम कनिष्ठ । भावर्थें बोलती पष्ट ।
आपुलाली उपासना श्रेष्ठ । मानिती जनीं ॥ ४ ॥
कोणीयेक ऐसें म्हणती । कर्ता देव मंगळमूर्ती ।
येक म्हणती सरस्वती । सर्व करी ॥ ५ ॥
येक म्हणती कर्ता भैरव । येक म्हणती खंडेराव ।
येक म्हणती बीरेदेव । येक म्हणती भगवती ॥ ६ ॥
येक म्हणती नरहरी । येक म्हणती बनशंकरी ।
येक म्हणती सर्व करी । नारायेणु ॥ ७ ॥
येक म्हणती श्रीराम कर्ता । येक म्हणती श्रीकृष्ण कर्ता ।
येक म्हणती भगवंत कर्ता । केशवराज ॥ ८ ॥
येक म्हणती पांडुरंग । येक म्हणती श्रीरंग ।
येक म्हणती झोटींग । सर्व करी ॥ ९ ॥
येक म्हणती मुंज्या कर्ता । येक म्हणती सूर्य कर्ता ।
येक म्हणती अग्न कर्ता । सकळ कांहीं ॥ १० ॥
येक म्हणती लक्ष्मी करी । येक म्हणती मारुती करी ।
येक म्हणती धरत्री करी । सर्व कांही ॥ ११ ॥
येक म्हणती तुकाई । येक म्हणती येमाई ।
येक म्हणती सटवाई । सर्वकरी ॥ १२ ॥
येक म्हणती भार्गव कर्ता । येक म्हणती वामन कर्ता ।
येक म्हणती परमात्मा कर्ता । येकचि आहे ॥ १३ ॥
येक म्हणती विरणा कर्ता । येक म्हणती बस्वंणा कर्ता ।
येक म्हणती रेवंणा कर्ता । सर्व कांहीं ॥ १४ ॥
येक म्हणती रवळया कर्ता । येक म्हणती स्वामी कार्तिक कर्ता ।
येक म्हणती वेंकटेश कर्ता । सर्व कांहीं ॥ १५ ॥
येक म्हणती गुरु कर्ता । येक म्हणती दत्त कर्ता ।
येक म्हणती मुख्य कर्ता । वोढ्या जगन्नथ ॥ १६ ॥
येक म्हणती ब्रह्मा कर्ता । येक म्हणती विष्णु कर्ता ।
येक म्हणती महेश कर्ता । निश्चयेंसीं ॥ १७ ॥
येक म्हणती प्रजन्य कर्ता । येक म्हणती वायो कर्ता ।
येक म्हणती करून अकर्ता । निर्गुण देव ॥ १८ ॥
येक म्हणती माया करी । येक म्हणती जीव करी ।
येक म्हणती सर्व करी । प्रारब्धयोग ॥ १९ ॥
येक म्हणती प्रेत्न करी । येक म्हणती स्वभाव करी ।
येक म्हणती कोण करी । कोण जाणे ॥ २० ॥
ऐसा कर्त्याचा विचार । पुसतां भरला बाजार ।
आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१ ॥
जेहिं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला ।
ऐसा लोकांचा गल्बला । वोसरेना ॥ २२ ॥
आपुलाल्या साभिमानें । निश्चयेचि केला मनें ।
याचा विचार पाहाणें । घडेचिना ॥ २३ ॥
बहु लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार ।
परंतु याचा विचार । ऐसा आहे ॥ २४ ॥
श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें तोडावा अनुमान ।
प्रत्यये मानावा प्रमाण । जाणते पुरुषीं ॥ २५ ॥
जें जें कर्तयानें केलें । तें तें त्याउपरी जालें ।
कर्त्यापूर्वीं आडळलें । न पाहिजे कीं ॥ २६ ॥
केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूतिक ब्रह्मादिक ।
तरी भूतांशें पंचभूतिक । केलें तें घडेना ॥ २७ ॥
पंचभूतांस वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें ।
पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यांस आलें ॥ २८ ॥
पंचभूतांवेगळें निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण ।
निर्विकारास विकार कोण । लाऊं शके ॥ २९ ॥
निर्गुणास कर्तव्य न घडे । सगुण जाल्यांत सांपडे ।
आतां कर्तव्यता कोणेकडे । बरें पाहा ॥ ३० ॥
लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि अप्रमाण ।
म्हणोनि हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जालें ॥ ३१ ॥
येक सगुण येक निर्गुण । कोठें लाऊं कर्तेपण ।
या अर्थाचें विवरण । बरें पाहा ॥ ३२ ॥
सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वींच आहे जालें ।
निर्गुणास कर्तव्य लाविलें । नवचे कीं कदा ॥ ३३ ॥
येथें कर्ताचि दिसेना । प्रत्यये आणावा अनुमाना ।
दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ॥ ३४ ॥
केलें तें अवघेंच लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें ।
वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ॥ ३५ ॥
बरें पाहाता प्रत्यये आला । तरी कां करावा गल्बला ।
प्रचित आलियां आपणाला । अंतर्यामीं ॥ ३६ ॥
आतां असो हें बोलणें । विवेकी तोचि हें जाणे ।
पूर्वपक्ष लागे उडवणें । येरवीं अनुर्वाच ॥ ३७ ॥
तंव श्रोता करी प्रस्न । देहीं सुखदुःखभोक्ता कोण ।
पुढें हेंचि निरूपण । बोलिलें असे ॥ ३८ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
कर्तानिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ १३.८

समास नववा : आत्माविवरण

॥ श्रीराम ॥

आत्मयास शेरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे ।
शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रगटचि आहे ॥ १ ॥
देह अन्नचि खायेना । तरी आत्मा कदापि जगेना ।
अत्म्याविण चेतना । देहास कैंची ॥ २ ॥
हें येकावेगळें येक । करूं जातां निरार्थक ।
उभयेयोगें कोणीयेक । कार्य चाले ॥ ३ ॥
देहाला नाहीं चेतना । अत्म्यास पदार्थ उचलेना ।

स्वप्नभोजनें भरेना । पोट कांहीं ॥ ४॥
आत्मा स्वप्नअवस्थेंत जातो । परंतु देहामध्यें हि असतो ।
निदसुरेपणें खाजवितो । चमत्कार पाहा ॥ ५॥
अन्नरसें वाढे शरीर । शरीरप्रमाणें विचार ।
वृद्धपणीं तदनंतर । दोनी लाहानाळती ॥ ६॥
उत्तम द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो ।
विस्मरणें शुद्धि सांडितो । सकळ कांहीं ॥ ७॥
देहानें घेतलें वीष । आत्मा जाये सावकास ।
वाढणें मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ॥ ८॥
वाढणें मोडणें जाणें येणें । सुख दुःख देहाचेनि गुणें ।
नाना प्रकारें भोगणें । आत्मयास घडे ॥ ९॥
वारुळ म्हणिजे पोकळ । मुंग्यांचे मार्गचि सकळ ।
तैसेंचि हें केवळ । शरीर जाणावें ॥ १०॥
शरीरीं नाडीच खेटा । नाडीमध्यें पोकळ वाटा ।
लाहान थोर सगटा । दाटल्या नाडी ॥ ११॥
प्राणी अन्नोदक घेतो । त्याचा अन्नरस होतो ।
त्यास वायो प्रवर्ततो । स्वासोस्वासें ॥ १२॥
नाडीद्वारां धांवे जीवन । जीवनामधें खेळे पवन ।
त्या पवनासरिसा जाण । आत्माहि विवरे ॥ १३॥
तृषेनें शोकलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार ।
मग उठवून शरीर । चालवी उदकाकडे ॥ १४॥
उदक मागे शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी ।
शरीर अवघें च हालवी । प्रसंगानुसार ॥ १५॥
क्षुधा लागते ऐसें जाणतो । मग देहाला उठवितो ।
आच्यावाच्या बोलवितो । ज्यासी त्यासी ॥ १६॥
बायेकांत म्हणे जालें जालें । देह सोवळें करून आणिलें ।
पायांत भरून चालविलें । तांतडीं तांतडीं ॥ १७॥
त्यासी पात्रावरी बैसविलें । नेत्रीं भरोन पात्र पाहिलें ।
हाताकरवीं आरंभिलें । आपोशन ॥ १८॥
हाताकरवीं ग्रास उचलवी । मुखी जाऊन मुख पसरवी ।
दातांकरवीं चाववी । नेटें नेटें ॥ १९॥
आपण जिव्हेमधें खेळे । पाहातो परिमळसोहळे ।
केंस काडी खडा कळे । तत्काळ थुंकी ॥ २०॥
आळणी कळतां मीठ मागे । बायलेसि म्हणे आगे कांगे ।
डोळे ताऊन पाहों लगे । रागें रागें ॥ २१॥
गोडी लागतांच आनंदे । गोड नस्तां परम खेदे ।
वांकडी गोष्टी अंतरी भेदे । आत्मयासी ॥ २२॥
नाना अन्नाची गोडी । नाना रसें स्वाद निवडी ।
तिखट लागतां मस्तक झाडी । आणी खोंकी ॥ २३॥
मिरपुडी घातली फार । कायसें करितें खापर ।
जिव्हेकरवीं कठिणोत्तर । बोलवी रागें ॥ २४॥
आज्य उदंड जेविला । सवेंच तांब्या उचलिला ।
घळघळां घेऊं लागला । सावकास ॥ २५॥
देहीं सुखदुःखभोक्ता । तो येक आत्माचि पाहातां ।
आत्म्याविण देह वृथा । मडें होये ॥ २६॥
मनाच्या अनंत वृत्ति । जाणणें तेचि आत्मस्थिति ।
त्रैलोकीं जितुक्या वेक्ती । तदांतरीं आत्मा ॥ २७॥
जगामध्यें जगदात्मा । विश्वामधें विश्वात्मा ।
सर्व चालवी सर्वात्मा । नाना रूपें ॥ २८॥
हुंगे चाखे ऐके देखें । मृद कठिण वोळखे ।
शीत उष्ण ठाउकें । तत्काळ होये ॥ २९॥
सावधपणें लाघवी । बहुत करी उठाठेवी ।
या धूर्ताच्या उगवी । धूर्तचि करी ॥ ३०॥
वायोसरिसा परिमळ येतो । परि तो परिमळ वितळोन जातो ।
वायो धुळी घेउनी येतो । परी ते हि जाये ॥ ३१॥
शीत उष्ण वायोसरिसें । सुवासें अथवा कुवासें ।
असिजे परी सावकासें । तगणें न घडे ॥ ३२॥
वायोसरिसे रोग येती । वायोसरिसी भूतें धांवती ।
धूर आणी धुकटें येती । वायोसवें ॥ ३३॥
वायोसवें कांहींच जगेना । आत्म्यासवें वायो तगेना ।
आत्म्याची चपळता जाणा । अधिक आहे ॥ ३४॥
वायो कठिणास आडतो । आत्मा कठिण भेदून जातो ।
कठिण पाहों तरी तो । छेदेहिना ॥ ३५॥
वायो झडझडां वाजे । आत्मा कांहींच न वाजे ।
मोनेंचि अंतरीं समजे । विवरोन पाहातां ॥ ३६॥
शरीरास बरें केलें । तें आत्मयास पावलें ।
शरीरयोगें जालें । समाधान ॥ ३७॥
देहावेगळे उपाये नाना । करितां आत्मयास पावेना ।
समाधान पावे वासना । देहाचेनि ॥ ३८॥
देहआत्मयाचें कौतुक । पाहों जातां हें अनेक ।
देहावेगळी आडणुक । आत्मयास होये ॥ ३९॥
येक असतां उदंड घडे । वेगळें पाहातां कांहींच न घडे ।
विवेकें त्रिलोकीं पवाडे । देहात्मयोगें ॥ ४०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मविवरणनाम समास नववा ॥ ९॥ १३.९

समास दहावा : शिकवणनिरूपण

॥ श्रीराम ॥

पालेमाळा सुमनमाळा । फळमाळा बीजमाळा ।
पाषाणमाळा कवडेमाळा । सुत्रें चालती ॥ १॥
स्फटिकमाळा मोहरेमाळा । काष्ठमाळा गंधमाळा ।
धातुमाळा रत्नमाळा । जाळ्या वोलि चांदोवे ॥ २॥
परी हें तंतूनें चालतें । तंतू नस्तां विष्कळीत होतें ।
तैसें म्हणों आत्मयातें । तरी साहित्य न पडे ॥ ३॥
तंतूस मणी वोविला । तंतूमध्येंचि राहिला ।
आत्मा सर्वांगीं व्यापला । पाहाना कां ॥ ४॥
आत्मा चपळ सहजगुणें । दोरी काये चळों जाणे ।

म्हणोन दृष्टांत देणें । साहित्य न घडे ॥ ५॥
नाना वल्लींत जळांश । उसांमध्यें दाटला रस ।
परी तो रस आणी बाकस । येक नव्हे ॥ ६॥
देही आत्मा देह अनात्मा । त्याहून पर तो परमात्मा ।
निरंजनास उपमा । असेचिना ॥ ७॥
रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचियां हारी ।
सगट समान सरी । कैसी करावी ॥ ८॥
देव दानव मानव । नीच योनी हीन जीव ।
पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ॥ ९॥
येकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें ।
येकासंगे मुक्त केलें । येकासंगें रवरव ॥ १०॥
साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां न ये ।
गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ॥ ११॥
पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहिंकडे अंतरात्मा ।
साधु भोंदु सीमा । सांडूंच नये ॥ १२॥
अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारे ।
पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥ १३॥
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडें ।
राजे आणि माकडें । येक कैसीं ॥ १४॥
भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणी तेंहि आप ।
कुश्चिळ उदक अल्प । सेववेना ॥ १५॥
याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १६॥
शूरांहून मानिलें लंडी । तरी युद्धप्रसंगीं नरकाडी ।
श्रीमंत सांडून बराडी । सेविता कैसें ॥ १७॥
येका उदकें सकळ जालें । परी पाहोन पाहिजे सेविलें ।
सगट अवघेंच घेतलें । तरी तें मूर्खपण ॥ १८॥
जीवनाचेंच जालें अन्न । अन्नाचें जालें वमन ।
परी वमनाचें भोजन । करितां न ये ॥ १९॥
तैसें निंद्य सोडूनद्यावें । वंद्य तें ह्रुदईं धरावें ।
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २०॥
उत्तमासि उत्तम माने । कनिष्ठांस तें न माने ।
म्हणौन करंटे देवानें । करून ठेवले ॥ २१॥
सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण ।
हरिकथा पुराण श्रवण । नीति न्याये ॥ २२॥
वर्तयाचाविवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळुहळु पुण्यलोक । करीत जावे ॥ २३॥
मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनास सिकवावें । हळुहळु ॥ २४॥
मुख्य मनोगत राखणें । हेंचि चातुर्याचीं लक्षणें ।
चतुर तो चतुरांग जाणें । इतर तीं वेडीं ॥ २५॥
वेड्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजये । निस्पृहासी ॥ २६॥
उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें येथासांग ।
प्राणिमात्राचा अंतरंग । होऊन जावें ॥ २७॥
मनोगत राखोन जातां । परस्परें होये अवस्ता ।
मनोगत तोडितां वेवस्तां । बरी नाहीं ॥ २८॥
याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ २९॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
शिकवणनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ १३.१०
॥ दशक तेरावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni